महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

शनिवार ■ १२ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०२१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# जनसुरक्षा विधेयकावरून दानवे-लाड आमनेसामने

## विधपरिषदेत खडाजंगी • विरोधकांचा सभात्याग - तरीही विधेयक मंजूर

**मुंबई : राष्ट्र विघातक डाव्या कडव्या विचारांनी तरुणाई प्रभावित होऊन ती नक्षलवादाकडे वळण्याचा धोका रोखण्यासाठी, देशाच्या सविधानाला झुगारणाऱ्या घातक नक्षल विचारांना पायबंद बसावा म्हणून महाराष्ट्र सरकारने विशेष जनसुरक्षा विधेयक आणले आहे. मात्र विधान परिषद सभआगृहात आज (10 जुलै) याच जनसुरक्षा विधेयकावरून राडा झाल्याचे पाहायला मिळाले. भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी दिवंगत हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेऊन केलेल्या वक्तव्यामुळे विरोधक आक्रमक झाले. त्यांनी या विधेयकाला विरोध करत सभात्याग केला.**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** सरकारनं आणलेल्या जनसुरक्षा विधेयकावरुन विधानपरिषदेत आज चांगलाच गोंधळ पाहायला मिळाला. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसह शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनं या विधेयकाला जोरदार विरोध दर्शवला. सत्ताधाऱ्यांच्या जे पोटात आहे तेच त्यांच्या ओठावर असल्याचं सांगत अंबादास दानवे यांनी सभागृह दणाणून सोडलं. शेवटी सभात्याग करुन आपला या विधेयकाला विरोध असल्याचं सांगत शिवसेनेचे सर्व आमदार बाहेर पडले. नंतर सभागृहाबाहेर उद्धव ठाकरे यांनी या विधेकावरील शिवसेनेचा का विरोध आहे? तसंच सभागृहात नेमकं काय घडलं? याबाबतची भूमिका सविस्तरपणे मांडली. मसुद्यात नलक्षवाद शब्दाचा उल्लेख नाही

ठाकरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, "जनसुरक्षा कायदा हा काल खालच्या सभागृहात बहुमताच्या जोरावर मंजूर करण्यात आलं. सत्ताधारी पक्षाकडं पाशवी बहुमत आहे. त्याचा ते उपयोग किंवा दुरुपयोग करत आहेत. आमचा या विधेयकला नेमका विरोध कशासाठी आहे? हे अनिल परब, सचिन अहिर या शिवसेनेच्या आमदारांनी तर अभिजीत पाटील या राष्ट्रवादीच्या आमदारानं विधानपरिषदेत स्पष्ट शब्दांत सांगितलं आहे. सरकार सांगताना असं सांगत आहे की, नक्षलवादाचा बिमोड करायचा आहे, दहशतवादाचा बिमोड करायचा आहे. पण या कायद्याच्या मसुद्यात कुठेही नक्षलवाद किंवा दहशतवाद असा उल्लेख केलेला नाही. सुरुवातीला फक्त कडवी डावी विचारसरणीच्या संघटना असा उल्लेख केलेला आहे"

**शिवसेना प्रमुखांनी ज्या विचारसरणीला मारलं म्हणजे याचं अर्थ त्यांच्या विचारणीविरुद्ध हे विधेयक आहे का? आपण नक्षलाविरोधात बोलत आहोत की वेगळ्या विषयावर बोलत आहोत. प्रसाद लाड कोणत्या विषयावर बोलत आहेत? हा माझा मुद्दा आहे. ते काहीही बोलणार का? शिवसेना प्रमुखांनी या विचारणीला मारलं, मला त्यांना विचारायचं आहे की, नक्की कोणत्या विचारणीला मारलं? नक्षलाविरोधात हे विधेयक आहे ना?**

**- अंबादास दानवे**

# भूमाफियांची नावे पोलिसांनी गुन्ह्यातून वगळली?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - डोंबिवली पश्चिमेत ठाकुरवाडीत बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदा इमारती भूमाफियांनी उभारल्या. महसूल दस्तऐवजांमध्ये हेराफेरी केली. या बेकायदा बांधकामांची दस्त नोंदणी करून त्यामधील सदनिका घर खरेदीदारांना विक्री केल्या. याप्रकरणी डोंबिवली महसूल विभागाने वरिष्ठांच्या आदेशावरून विष्णुनगर पोलीस ठाण्यात २२ भूमाफियांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणात एका वकिलासह सहा माफियांची नावे गुन्ह्यातून वगळण्यात आली आहेत. ही नावे पुन्हा समाविष्ट करण्यात यावीत या मागणीसाठी तक्रारदार विनोद जोशी यांनी मुंबईत आझाद मैदान येथे बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

बेमुदत उपोषणाचा शनिवारी पाचवा दिवस आहे. डोंबिवली पश्चिमेतील मौजे नवी डोंबिवलीतील ठाकुरवाडी गट क्रमांक २६-१४, २६-१५, २६-१६ या मिळकर्तीवर २९ भूमाफियांनी संगनमत करून पालिकेची बनावट कागदपत्रे, शिक्के, स्वाक्षऱ्या करून बांधकाम परवानगीची कागदपत्रे तयार केली. या कागदपत्रांच्या आधारे दोन बेकायदा इमारतींची उभारणी केली. या बेकायदा इमारतींची कागदपत्रे दस्त नोंदणीकृत करून या बेकायदा इमारतींमधील सदनिका भूमाफियांनी घर खरेदीदारांना या इमारती अधिकृत आहेत असे दाखवून विक्री केल्या.

या माध्यमातून शासन, पालिकेचा लाखो रूपयांचा महसूल माफियांनी बुडविला आणि घर खरेदीदारांची फसवणूक केली. या बेकायदा इमारतींवर कारवाई करण्यासाठी तक्रारदार विनोद जोशी यांनी पालिकेकडे पाठपुरावा केला. पालिका अधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही. महसूल अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी केली. बनावट कागदपत्रांच्या आधारे, बनावट सातबारा, फेरफार तयार करून त्यामध्ये वारस नसलेल्यांची नावे घुसवून या इमारतींची उभारणी केली असल्याचे महसूल अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले.

# नरेश म्हस्के किरीट सोमय्यांचा नौपाडा पोलीस ठाण्यात ठिय्या



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाण्यातील भाजपचे माजी शहराध्यक्ष, माजी नगरसेवक संजय वाघुले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते अशा एकूण ३६ जणांविरोधात काही दिवसांपूर्वीच नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणाचा जाब विचारण्यासाठी गुरुवारी रात्री शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के, भाजपचे माजी खासदार किरीट किरीट सोमैया यांच्यासह भाजप, शिवसेनेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नौपाडा पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला. त्यानंतर हे प्रकरण अन्य पोलीस ठाण्यात वर्ग करण्याचे आश्वासन पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे यांनी दिले.

ठाणे रेल्वे स्थानक परिसरात एक संस्था होती. या संस्थेमध्ये संजय वाघुले यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह तक्रारदार डॉक्टर यांना डांबून ठेवल्याचा आरोप आहे. नौपाडा पोलीस त्यांना घेऊन जात असताना त्यांच्यावर हल्ला झाल्याचा आरोपही त्यांनी केला. याप्रकरणी त्यांनी तक्रार दिल्यानंतर संजय वाघुले यांच्यासह ३६ जणांवर गुन्हा दाखल आहे. यामध्ये भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पालक आणि विद्यार्थ्यांचाही सामावेश आहे. तर संबंधित डॉक्टर विरोधातही फसवणूकीचा गुन्हा दाखल आहे. सत्ताधारी भाजपच्या माजी शहराध्यक्षावर गुन्हा दाखल झाल्याने याप्रकरणाची चर्चा ठाण्यात रंगली होती. दरम्यान, या प्रकरणाची दखल घेऊन भाजपाचे माजी खासदार किरीट किरीट सोमैया आणि खासदार नरेश म्हस्के यांनी गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास नौपाडा पोलीस ठाण्याला भेट देऊन ठिय्या धरला. तसेच या प्रकरणाचा पोलिसांना जाब विचारला. अवघ्या १७ ते १८ वर्षांच्या मुलाविरोधात थेट गंभीर कलमांचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावा करत त्यांनी संताप व्यक्त केला. तसेच पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे, साहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया ढाकणे यांच्याकडे गुन्हा रद्द करण्याची मागणी करण्यात आली. या प्रकरणी नौपाडा पोलिस ठाण्यातील वरिष्ठ पोलिस निरीक्षकांच्या भूमिकेबाबतही सवाल केला.

अखेर या प्रकरणाचा गुन्हा नौपाडा पोलिस ठाण्यातून इतर पोलिस ठाण्यात वर्ग करण्याचे आश्वासन उपायुक्त सुभाष बुरसे यांनी दिले. त्याचबरोबर नौपाडा पोलिसांबद्दल विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या उपायुक्त स्तरावर तक्रारी ऐकून जबाब नोंदविला जाईल. त्यानंतर महिनाभरात योग्य अहवाल करून कारवाई करण्याचे आश्वासन उपायुक्त बुरसे यांनी दिले. त्याचबरोबर या प्रकरणी गुन्हा रद्द करण्याच्या मागणीबाबत कायदेशीर बाबी तपासून योग्य निर्णय घेण्याचे आश्वासनही देण्यात आले.

## थोडक्यात महत्वाचे

# ॲप आधारित प्रवासी सेवांवर परिवहन विभागाची करडी नजर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील ॲप वर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी राज्यात व्यवसाय करताना कायदेशीर तत्वांचे पालन करणे आवश्यक आहे. खाजगी वाहतूक व्यवसाय करणाऱ्या बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी नियमांचे उल्लघंन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. विधानभवन येथे ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी च्या विविध विषयासंदर्भात बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते.

यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यासह परिवहन विभागाचे इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, राज्य शासन नेहमीच या क्षेत्रात होणा-या सकारात्मक बदलांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रमांना पाठबळ देत आले आहे. कोणत्याही ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी कायदेशीर बाबींचे पालन करूनच वाहतूक व्यवसाय केला पाहिजे. राज्य शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शासन कडक कारवाई करेल.

दरम्यान, ॲपवर आधारित बसेस, कार, बाईक टॅक्सी यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन होणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात, शासनाने बनविलेले नियम हे प्रवाशांच्या हिताचे असल्यामुळे त्यांच्या हिताचे संरक्षण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# अनुपस्थिती भोवली ! डॉ. कृणाल सोनावणे यांची तातडीने सेवा समाप्ती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर, ता. ११ :** सरावली, डहाणू येथे गरोदर महिलांसाठी नियोजित आरोग्य तपासणी शिबिरात भरारी पथकातील डॉ. कृणाल सोनावणे हे अनुपस्थित राहिल्याच्या गंभीर प्रकरणात आता प्रशासनाने ठोस पावले उचलली आहेत. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी शुक्रवारी (ता. ११) तातडीने आदेश देऊन सेवा समाप्तीची कारवाई केली आहे. शिबिरातील अनुपस्थितीची बाब समोर आल्यानंतर आरोग्य विभागाने यावर तत्काळ कारवाई सुरू केली. चौकशीची जबाबदारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्याकडे देण्यात आली होती. त्यांनी सखोल चौकशी करून अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष चौधरी यांच्याकडे सादर केला. चौकशी अहवालात डॉ. सोनावणे यांची सेवा कसूर स्पष्ट झाल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मान्यतेने जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी तात्काळ सेवा समाप्तीची कार्यवाही केली.



# अंजुरफाटा-चिंचोटी रास्ता खड्ड्यात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मानकोली अंजुर फाटा ते चिंचोटी रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने नागरिकांना आपला जीव मुठीत धरून या महामार्गावरून प्रवास करावा लागत आहे. मात्र रस्त्याच्या या दुरावस्थेकडे सरकारी यंत्रणा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. या रस्त्यावर कालवार गावाजवळ भला मोठा खड्डा पडल्याने रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे. या खड्ड्यात मोठा टेम्पो अदळल्याने टेम्पो नादुरुस्त होऊन बंद पडला. हा खड्डा इतका मोठा होता की टेम्पोचे पुढचे चाक खड्ड्यात तर मागचे चाक वर उचलले गेले. या मार्गावर टोल वसुली करणाऱ्या सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने ताब्यात घेत येथील टोल वसुली बंद करण्याचे आदेश दिले आहेत.त्यामुळे या रस्त्याच्या दुरावस्थेकडे बांधकाम विभागासह कोणत्याही यंत्रणेचे लक्ष नाही. सध्या या रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले असून पावसाळ्यात या रस्त्यावरील खड्डे भरणार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत असल्याने या पावसाळ्यात येथील ग्रामस्थांसह वाहन चालकांना खड्ड्यातूनच प्रवास करावा लागणार अशी परिस्थिती आहे.












# मुंबई विद्यापीठ उपकेंद्राला आनंद दिघेंचे नाव द्या

## - ठाकरे गट युवासेनेचे आंदोलन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये मंजुरी मिळूनही कल्याण येथील उपकेंद्राला आनंद दिघे यांचे नाव देण्यात आलेले नाही. या उपकेंद्राला आनंद दिघे यांचे नाव न दिल्यास आम्हीच नामकरण सोहळा करू, असा इशारा शिवसेना ठाकरे युवासेनेने दिला होता. या अनुषंगाने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून शिवसेना ठाकरे युवा सेनेने कल्याण उपकेंद्राच्या भिंतीवर 'धर्मवीर आनंद दिघे - मुंबई विद्यापीठ कल्याण उपकेंद्र' असा नामफलकच झळकावला. याप्रसंगी 'धर्मवीर आनंद दिघे साहेबांचा विजय असो' या घोषणा देत अधिसभा सदस्यांनी परिसर दणाणून सोडला होता.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण उपकेंद्राला आनंद दिघे यांचे नाव देण्यास दिरंगाई होत असताना हे नामकरण करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मुंबई विद्यापीठाकडे आग्रह धरला. मात्र मुंबई विद्यापीठाने दुर्लक्ष केल्यामुळे ठाकरे गटाच्या युवा सेनेने कल्याण उपकेंद्राच्या भिंतीवर 'धर्मवीर आनंद दिघे - मुंबई विद्यापीठ कल्याण उपकेंद्र' असा नामफलक झळकावला. या नामकरण सोहळ्याप्रसंगी सिनेट सदस्य शितल शेठ -देवरुखकर, प्रदीप सावंत, जिल्हा प्रमुख अल्पेश भोईर, परमात्मा यादव, मिलिंद साटम, धनराज कोहचडे, किसन सावंत आणि माजी अधिसभा सदस्य राजन कोळंबेकर आदी उपस्थित होते.

# गीतासार



**अध्याय १६**
**दैवासुरसम्पद्विभागयोगः**

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः । प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥ १६-९ ॥

या खोट्या ज्ञानाचा अवलंब करून ज्यांचा स्वभाव नष्ट झाला आहे आणि ज्यांची बुद्धी मंद आहे असे सर्वांवर अपकार करणारे क्रूरकर्मी मनुष्य केवळ जगाच्या नाशाला समर्थ होतात. ॥ १६-९ ॥

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः । मोहाद्गृहीत्वासद्ग्राहान्प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः ॥ १६-१० ॥

ते दंभ, मान आणि मद यांनी युक्त असलेले मनुष्य कोणत्याही प्रकारे पूर्ण न होणाऱ्या कामनांचा आश्रय घेऊन अज्ञानाने खोटे सिद्धांत स्वीकारून भ्रष्ट आचरण करीत जगात वावरत असतात. ॥ १६-१० ॥

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः । कामोपभोग परमा एतावदिति निश्चिताः ॥ १६-११ ॥

तसेच ते आमरणान्त असंख्य चिंतांचे ओझे घेतलेले विषयभोग भोगण्यात तत्पर असलेले, हाच काय तो आनंद आहे, असे मानणारे असतात. ॥ १६-११ ॥

# गद्दारांना गद्दार नाही ; तर काय बोलणार ?

## - शिंदे गटाचे नगरसेवक नितीन तेलवणे यांचे राम दुधाळेवर टिकास्त्र



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड नगरपंचायत मधील उपनगराध्यक्ष पदाच्या निवडणूकीवेळी ऐन मतदान प्रक्रिया सुरु असताना भाजपा नगरसेवकांनी केलेली बंडखोरी व घडलेले राजकीय नाट्य काही थांबण्याची चिन्हे दिसत नसून उपनगराध्यक्ष पदासाठी शिंदे गटाच्या नगरसेविका नम्रता नितीन तेलवणे यांचा पराभव झाल्याने मुरबाड शहरातील राजकीय वातावरण ढवळुन निघाले आहे.आरोप प्रत्यारोपाच्या फैरी चालुच असून काल प्रभाग क्रमांक 14 चे शिंदे गटाचे नगरसेवक नितीन आण्णा तेलवणे व त्यांच्या पत्नी सौ.नम्रता नितीन तेलवणे यांनी पत्रकार परिषद घेत माजी नगराध्यक्ष राम दुधाळे व विद्यमान नगराध्यक्षासह भाजपा नगरसेवकांचा खरपुस समाचार घेतला.

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना त्यांनी राम दुधाळे हा गद्दारच आहे त्याच्यासाठी दुसरा शब्दच नाही. आज पर्यंत तो प्रत्येकाशी गद्दारीच करत आला आहे.सुरुवातीला जुगल जाखोटिया यांच्याशी केली.त्यांनतर अर्जुन शेळके यांच्याशी गद्दारी केली व आता कथोरे साहेबांनी ऐनवेळी पक्षात घेऊन प्रभाग क्रमांक 3 मधून निवडुन आणले व नगराध्यक्ष बनवले त्यांच्याशी सुद्धा याला एकनिष्ठ राहता आले नाही आणी यापुढेही तो सध्या बरोबर असणार्या नगरसेवकांना फसवणार असल्याचा टोळा लगावला.

भाजप मधून बाहेर पडून वेगळा गट स्थापन केलेल्या या नगरसेवकांना शिंदे गटात प्रवेश मिळणार नाही त्यासाठी आमचा विरोध असून याबाबत लवकरच पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे साहेबांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर आमदार कथोरे साहेबांनी निधी देताना कोणताही भेदभाव केला नसून आमच्या वार्डातही विकासकामे झाली आहेत.त्यामुळे त्यांनी आमदारांवर केलेला आरोप बिनबुडाचा आहे.असे असते तर शहरातील प्रत्येक वार्डात जी विकासकामे झाली आहेत ती झाली नसती असे नगरसेविका नम्रता तेलवणे यांनी ठणकावून सांगितले. या पत्रकार परिषदेला प्रभाग क्रमांक 7 चे शिंदे गटाचे नगरसेवक अक्षय रोठे सुद्धा उपस्थित होते.

# केमिस्ट असोसिएशन मार्फत मुदतबाह्य व न वापरलेल्या औषधांचे होणार संकलन

## - मा. श्री जगन्नाथ अप्पा शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 10 जुलै 2025 रोजी, कल्याण येथे अखिल भारतीय तसेच महाराष्ट्र राज्य औषध विक्रेता संघटनेचे अध्यक्ष श्री जगन्नाथ आप्पा शिंदे यांच्या हस्ते ' पर्यावरण वाचवूया - औषधांचा गैरवापर टाळूया !' या संकल्पनेतून, मुदत बाह्य, उरलेली व न वापरलेली औषधांचे संकलन व त्याचे शास्त्रीय विल्हेवाट लावणे करिता टेकबॅक या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला

केंद्र सरकारच्या स्वास्थ्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या सेंट्रल ट्रक स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन द्वारे नुकतेच मे 2025 मध्ये सर्व राज्यांच्या औषध नियंत्रकांना एक्सपायर तसेच न वापरलेल्या औषधांचे शास्त्रीय विल्हेवाट लावण्याकरिता चे परिपत्रक आणि विस्तृत मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत.

त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था ,,महानगरपालिका यांच्यासोबत केमिस्ट असोसिएशनच्या सहभागातून पर्यावरणाला तसेच समाज आरोग्याला घातक ठरणाऱ्या एक्सपायर व शिल्लक औषधींच्या शास्त्रीय विल्हेवाट करणे विषयीच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाराष्ट्र राज्य केमिस्ट आणि ड्रगिस्ट असोसिएशन हे प्रत्येक केमिस्ट सभासदाकडे ग्रीन ड्रॉप बॉक्सची सोय ग्राहकांकरता करणार असल्याचे श्री जगन्नाथ आप्पा शिंदे यांनी याप्रसंगी सांगितले.



सरकारच्या या भूमिकेचे स्वागत करताना त्यांनी हे देखील नमूद केले की सदर मुदत बाह्य औषधांचे संकलन कार्यक्रम गेल्या वर्षीच म्हणजे ऑक्टोबर 2024 मध्ये राज्य संघटनेने आपल्या पश्चिम महाराष्ट्र झोन मधून कोल्हापूर व आसपासच्या भागात पहिल्या टप्प्यात सुरू केलेला आहे.

त्यानंतर आता याची राज्यभर व्याप्ती वाढवत ठाणे जिल्ह्यातून केमिस्टचा सक्रिय सहभाग व महानगरपालिकांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट टीम बरोबर संयुक्त प्रकल्प राबवला जाणार आहे.

मुदतबाहय किंवा न वापरण्याऱ्या अयोग्य असे औषध कचऱ्यात, गटारीत वा रस्त्यावर फेकली जात आहेत. अशा औषधामुळे प्रदूषणाला हातभार लागत आहे. हे प्रदुषण टाळण्यासाठी अशी औषधे कचऱ्यात न टाकता परिसरातील केमिस्टकडे आणून द्या. प्रदूषण टाळण्यासाठी, त्याची बायो वेस्ट या यंत्रणेमार्फत केमिस्ट असोसिएशनमार्फत विल्हेवाट लावली जाणार आहे. अशी माहीती त्यांनी यावेळी दिली. कल्याण शहरात सुमारे 800 व ठाणे जिल्ह्यात जवळपास 5000 औषध मेडिकल दुकाने आहेत. या प्रत्येक मेडिकल दुकानांमध्ये एक ग्रीन ड्रॉप बॉक्स देऊन येणाऱ्या ग्राहकांकडून मुदतबाह्य औषधांचे संकलन करण्याचा संकल्प असोसिएशनने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून केला आहे. मुदतबाह्य औषधामुळे प्रदूषण होऊन, मानवी आरोग्याला धोका निर्माण होत आहे. प्रत्येक मेडिकलमध्ये मुदतबाह्य औषध साठवणुकीसाठीची सोय केली आहे. सदर कार्यक्रमाला ठाणे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष श्री देशमुख- सचिव व पदाधिकारी तसेच अनेक लेखांमध्ये ग्राहकांची जनजागृती करणाऱ्या प्राध्यापिका मंजिरी घरत यादेखील उपस्थित होत्या.

# धर्मांतर करून आरक्षणाचा लाभ घेणाऱ्यांवर कारवाई

## - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आरक्षणाचा लाभ ज्या धर्मातील प्रवर्गात घेतला आहे, त्याच धर्मात असण्याबाबत निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन करून धर्मांतर करीत आरक्षणाचा लाभ घेत असलेल्यांवर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले.

जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या प्रकरणाबाबत सदस्य गोपीचंद पडळकर यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य जितेंद्र आव्हाड यांनीही सहभाग घेतला.

बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणे हा गुन्हा असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जबरदस्तीने धर्मांतर अधिक कठोर कायदा करण्यात येईल. राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समितीचा अहवाल शासनास सादर झाला आहे. या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

आरक्षणाचा लाभ ज्या धर्मात असताना घेतला आहे, त्याच धर्मात राहण्याबाबतचा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर करून शासन याबाबत कार्यवाही करेल. काही प्रकरणांमध्ये आरक्षणाच्या लाभाचा गैरफायदा घेतला जात आहे. असे आढळून आले आहे. अशा प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाचा आदेश शासन पाळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, सांगली जिल्ह्यातील सक्तीच्या धर्मांतर प्रकरणात संबंधित धर्मगुरू यांना अटकपूर्व जामीन मिळालेला आहे. याबाबत अपील दाखल करून गुन्हा विलंबाने दाखल केल्याबाबत संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचीही चौकशी करण्यात येईल. पुणे जिल्ह्यातील धर्मांतरण प्रकरणांमध्ये विशेष चौकशी समितीचा अहवाल एक महिन्याच्या आत घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

# पलावा पूल सुस्थितीत वाहतूक सुरळीत सुरु

## आमदार राजेश मोरे यांनी केली पुलाची पाहणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पलावा पूल सुस्थितीत असून या पुलावरील वाहतूक सुरळीत सुरू असल्याची माहिती आमदार राजेश मोरे यांनी पुलाची पाहणी करत विरोधकांच्या टीकेला उत्तर दिलं आहे. त्यांनी स्पष्ट केलं की "विकास हा आमचा खरा अजेंडा आहे". नागरिकांच्या सुविधा आणि प्रश्न सोडवणे हेच आमचं प्राधान्य असल्याचं त्यांनी सांगितले.

कल्याण शीळ रोडवरील पलावा पुलाची पाहणी करत शिवसेना आमदार राजेश मोरे यांनी ठाकरे गट, मनसेसह विरोधकांना टोला लगावला. लोकांच्या सोयीसाठी पूल सुरू केला. टीका करणार्यांना टीका करू द्या आम्ही विकासाच्या माध्यमातून उत्तर देणार. वाहतूक सुरळीत झाली पाहिजे यासाठी पुलाची पाहणी केली आहे. या पाहणीदरम्यान पुलावर स्टोन क्रशर टाकण्यात आले होते, त्यात पाऊस पडल्याने खड्डे पडल्यासारखे दिसत होते, मात्र प्रत्यक्षात खड्डे पडलेच नव्हते. टीकाकारांचे काम टीका करण्याचे आहे, आमचं काम विकासकामे करण्याचे आहे. टीका करणार्यांना टीका करू द्या आम्ही विकासाच्या माध्यमातून उत्तर देणार असल्याचे सांगितले.

पुलावर खड्डे नाही, अपघात झाल्याची कोणत्याही पोलीस स्टेशन मध्ये नोंद नाही. विरोधकांनी खोटेनाटे पसरवले होते, त्यामुळे टीकाकारांकडे आम्ही लक्ष देत नाही. पुलाचे उदघाटन झाले नाही, आम्ही लोकांच्या सेवेसाठी पूल खुला केला असल्याचे राजेश मोरे यांनी सांगितले.

# पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता पावसाळ्यात पाण्याखाली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील मुंबई नाशिक महामार्गावरील पडघा हे गाव असून महामार्गावरच प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. मात्र प्राथमिक आरोग्य केंद्राकडे जाणारा रस्ता पावसाळयामध्ये कायम पाण्याने भरलेला असतो. त्यामुळे दवाखान्यात अपघात ग्रस्त तसेच आजारी नागरिकांना आणण्यासाठी अतिशय त्रास होत आहे.

मुंबई नाशिक हा महामार्ग असून येथे कायम छोटे-मोठे अपघात होत असतात अशावेळी पडघा प्राथमिक आरोग्य केंद्र हे महामार्गावर असल्याने नागरिकांसाठी सोयीचे आहे. परंतु प्राथमिक आरोग्य केंद्राकडे पुलाखालून जाणारा रस्ता खराब झाला असुन पावसाळयामध्ये कायम पाण्याने भरलेला असतो. त्यामुळे अपघातग्रस्त लोकांना दवाखान्यात नेण्यासाठी तसेच आजारी नागरीकांना ये जा करण्यासाठी सोयीचा राहिलेला नाही. पडघा परिसरातील 40 ते 50 खेडी, पाडी, गावे असून त्या सर्व परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र हाच मोठा एकमेव आधार आहे .तसेच आजूबाजूच्या खेड्या, पाड्यातील आदिवासी बांधवांना देखील याशिवाय दुसरा पर्याय नाही. तसेच या पुलाखालून भादाणे, आतकोली, जुपाडा चिराडपाडा, येथील जाणाऱ्या हजारो नागरीकांची व वाहनाची तुंबलेल्या पाण्यामुळे गैरसोय होत आहे. तर तुंबलेल्या पाण्यातून वाटचाल करताना अनेक गंभीर संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही दरवर्षी पावसाळ्यात हा रस्ता पाण्याने भरलेला असतो त्याकडे ना स्थानिक ग्रामपंचायत कमीटी,प्रशासन लक्ष देते ना टोल नाका प्रशासन लक्ष देते. तसेच या गंभीर समस्येबाबत एकाही लोकप्रतिनिधींनी आवाज उठवला नाही त्यामुळे पावसाळ्याचे तीन-चार महिने नागरिकांना हाल अपेष्टा सहन करत प्राथमिक आरोग्य केंद्र गाठावे लागते.

# पेण एज्युकेशन सोसायटीचा वारसा विद्यार्थ्यांनी पुढेही चालवावा

## - बापूसाहेब नेने



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण एज्युकेशन सोसायटीने आत्तापर्यंत नऊ आमदार दोन खासदार सात जिल्हा परिषद अध्यक्ष पंचायत समितीचे 11 सभापती 16 डॉक्टर्स पेण व अलिबाग येथे नामवंत 37 वकील यांचा वारसा तुम्हा सगळ्या विद्यार्थ्यांना चालवायचा आहे त्यामुळे तुम्ही ठरवा की आपण नक्की कोण व्हायचं वकील डॉक्टर शिक्षक का वैज्ञानिक खरं सांगायचं तर एक विद्यार्थी नाटो मध्ये उच्च पदावर आहे आहे तसेच एक विद्यार्थी नासामध्ये असून त्यांनी खूप मोठे नाव कमावलं आहे परदेशात 140 विद्यार्थी उच्च पदावर आहेत यांच्यासारखाच तुम्हाला वारसा चालवायचा आहे यासाठी कसून अभ्यास करावा लागेल नुसत्या गप्पा मारून किंवा देवाजवळ प्रार्थना करून काही भागत नाही त्यासाठी कष्ट करण्याची तयारी केली पाहिजे चांगला अभ्यास करा मोठे व्हा आणि पेण एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचा वारसा कायमस्वरूपी चालवावा आज जसा या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार झाला याहीपेक्षा मोठा सत्कार तुमचा होणं गरजेचं आहे ती संधी आम्हाला यापुढेही मिळू दे यासाठी परमेश्वराला साकडे घालतो असे पेण एज्युकेशन सोसायटीचे आधारस्तंभ माजी अध्यक्ष एडवोकेट बापूसाहेब नेने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

पेण एज्युकेशन सोसायटीची प्राथमिक शाळा आणि सोबती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून गरीब गरजू होतकरू विद्यार्थिनींना सावित्रीबाई दत्तक पालक योजनेअंतर्गत गणवेश वाटप व सोबती संघटनेतर्फे विविध शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच एम टी एस परीक्षेत केंद्र आणि राज्यस्तरावर नावलौकिक मिळवलेल्या विद्यार्थिनींचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे माजी अध्यक्ष एडवोकेट बापूसाहेब नेने संस्थेचे माजी कार्याध्यक्ष वसंत आठवले सोबतीच्या सौ जागडे मॅडम मुख्याध्यापिका सौ लेखा ठाकूर आणि शिक्षक वर्ग यावेळी उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांनी सुस्वर आवाजात गुरुने दिला ज्ञानरूपी वसा या प्रार्थनेचे गायन केले मुख्याध्यापकांच्या हस्ते मान्यवरांचा व शिक्षकांचा स्वागत सत्कार करण्यात आला. विद्यार्थी व शिक्षकांनी गुरुचे महत्व आणि गोष्ट सांगितली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली.

# कमलाकर जाधव यांची शिवसेना (उबाठा) शहापूर तालुका संपर्क प्रमुख पदी निवड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) : वासिंद जवळील भातसई येथील जेष्ठ कार्यकर्ते कमलाकर जाधव यांची शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शहापूर तालुका संपर्क प्रमुख पदावर फेर निवड झाली आहे.

गेल्या चाळीस वर्षापासून कमलाकर जाधव हे शिवसेनेत कार्यरत आहेत. शाखा प्रमुख, विभाग प्रमुख ते उप तालुका प्रमुख अशी पदांवर कार्यरत राहून पक्ष संघटनेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्याबरोबर पक्ष संघटना वाढीसाठी प्रयत्न केले आहेत. तसेच एस्सेल प्रोपॅक कंपनीत जनसंपर्क अधिकारी म्हणून सेवेत राहून कंपनीच्या माध्यमातून येथील ग्रामीण भागात विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य विषयक प्रश्न सोडवून विकास कामांना प्राधान्य दिले आहे. तसेच धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या प्रेरणेने वासिंद विभागात धर्मवीर प्रतिष्ठान हि सामाजिक संघटना स्थापन करून कबड्डी स्पर्धासह आदी उपक्रम राबविले आहेत.

कमलाकर जाधव यांच्या झालेल्या सेवा साफल्य कार्यक्रमात त्यांना नियुक्तीपत्र देऊन शहापूर तालुका संपर्क प्रमुख या पदावर फेर निवड केली आहे. यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ठाणे जिल्हा उपप्रमुख शंकर खाडे, तालुकाध्यक्ष कुलदीप धानके, ज्येष्ठ कार्यकर्ते रमेश जगे, विस्तारक गणेश अवसरे, सचिव रविंद्र लकडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# रेसिपी

## गव्हाच्या पिठाचा शिरा



साहित्य :गव्हाचे पीठ (कणिक): १ वाटी
साखर: ¾ वाटी (किंवा चवीनुसार)
तूप: ½ वाटी
पाणी: २ वाट्या
वेलची पावडर: ¼ टीस्पून
काजू, बदाम, मनुके: १-२ टेबलस्पून (पर्यायी)
केशर: २-३ काड्या (पर्यायी, दूधात भिजवलेल्या)

कृती-एका कढईत किंवा जाड बुडाच्या भांड्यात मध्यम आचेवर तूप गरम करा.त्यात काजू, बदाम आणि मनुके घालून हलके सोनेरी होईपर्यंत तळून घ्या. बाजूला काढून ठेवा.त्याच तुपात गव्हाचे पीठ घाला. मंद आचेवर सतत ढवळत पीठ खमंग आणि सोनेरी रंगाचे होईपर्यंत (साधारण ८-१० मिनिटे) भाजून घ्या.पीठ भाजताना खमंग वास येईल आणि पीठ तुपातून तेल सोडेल. याची काळजी घ्या की पीठ जळणार नाही.दुसऱ्या भांड्यात २ वाट्या पाणी उकळत ठेवा. (पाणी गरम असणे आवश्यक आहे.) भाजलेल्या पिठात हळूहळू गरम पाणी घाला आणि सतत ढवळत राहा जेणेकरून गुठळ्या होणार नाहीत.पाणी पूर्ण मिसळल्यानंतर साखर घाला आणि पुन्हा नीट ढवळा. साखर विरघळेपर्यंत मंद आचेवर शिजवत राहा.शिरा घट्ट होऊ लागेल तेव्हा त्यात वेलची पावडर आणि भिजवलेले केशर घाला.तळलेले काजू, बदाम, आणि मनुके घालून मिसळा.शिरा तूप सोडू लागला की गॅस बंद करा.उलटा. एका पॅनमध्ये तेल गरम करा. तयार केलेले बर्गर मध्यम आचेवर सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.आज तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्यासाठी सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**मिथुन**
मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाईल. तुम्ही तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल .

**कर्क**
एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल.

**सिंह**
दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे. व्यवसायात नफा मिळविण्यासाठी तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल.

**कन्या**
वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**तूळ**
कामाच्या ठिकाणी तुमचे काम चांगले होईल. तुम्हाला काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल.


**वृश्चिक**
महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील.

**धनु**
विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**मकर**
नियोजित काम पूर्ण होईल.तुम्ही काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल, यामुळे काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल.

**कुंभ**
विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमच्या कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी तुम्हाला काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल.

**मीन**
विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते. आज तुम्हाला नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते.




# बिल्डरांकडून हमीपत्र घेऊन बांधकामाला परवानगी

## नवी मुंबईतील पुनर्विकास प्रकल्पांना मोठा दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** शहरातील उपनगरांमध्ये सिडकोने उभारलेल्या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासात उभे राहिलेले अडथळे दूर करण्यास राज्याच्या नगरविकास विभागाने सुरुवात केली आहे. पालिका क्षेत्रातील विकास प्रस्तावांना, प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्याआधी पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला घेण्याच्या अटीवर, महापालिका आयुक्त स्तरावर प्रस्तावांना तत्त्वतः मंजुरी देण्याचे तसेच त्यासाठी विकासकांकडून हमीपत्र घेण्याचे लेखी आदेश नगरविकास विभागाने नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. नगरविकास विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर हे निर्देश देण्यात आले.

पर्यावरण विभागाचा 'ना हरकत' दाखला मिळत नाही तोवर शहरातील कोणत्याच बांधकामांना परवानगी देऊ नये असे राज्य सरकारचे आदेश होते. पर्यावरण विभागासंबंधीची एक याचिका सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी दाखल असल्याने या विभागाने असे दाखले देण्याची प्रक्रिया थांबवली होती. त्यामुळे शहरातील सिडको तसेच इतर बांधकामांना परवानगी मिळत नव्हती. सिडको वसाहतीत राहणारी हजारो कुटुंबे यामुळे हवालदिल झाली होती. महापालिका परवानगी देत नाही आणि इमारत धोकादायक असल्याने वीज आणि पाणी जोडणी कापली जात असल्याने रहिवाशी दुहेरी कात्रीत सापडले होते. राज्य सरकारने अखेर यावर तोडगा काढताना बिल्डरांकडून हमीपत्र घेऊन बांधकाम परवानगी देण्याचा मार्ग खुला केला आहे.

नवी मुंबईतील विशेषतः वाशी, नेरूळ कोपरखैरणेसह विविध विभागात धोकादायक तसेच मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाला यामुळे दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून पर्यावरण विभागाच्या ना-हरकत दाखल्याच्या अटीमुळे यापैकी बहुसंख्य प्रकल्प रखडले होते. खासदार नरेश म्हस्के यांनी यासंबंधी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्यासोबत झालेल्या बैठकीत शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख किशोर पाटकर यांनीही हा मुद्दा उपस्थित केला होता. यावर तोडगा काढण्यासाठी आता नगरविकास विभागाने महापालिकेला लेखी आदेश दिले आहेत.

# पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आदिवासी विद्यार्थिनीची गगन भरारी!!

## ठाणे जिल्ह्यात गुणवत्ता यादीत भूमिका भला हिची उल्लेखनीय कामगिरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण**
**:: नरेंद्र पाटील**

जिल्हा परिषद दोनघर या आदिवासी पाड्यातील शाळेमध्ये शिकणारी भूमिका विठ्ठल भला हिने नुकत्याच झालेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यात गुणवत्ता यादीत झळकून गगन भरारी घेतली व आपल्या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

दोन घर या आदिवासी पाड्यातील शाळेत शिकणारी भूमिका भला ही अत्यंत हुशार मुलगी असून तिने मंथन परीक्षेत व जवाहर नवोदय महाविद्यालयात झालेल्या परीक्षांमध्ये धवल यश संपादन केले आहे.

खडतर परिश्रम व अविरत प्रयत्न तसेच शाळेतील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यामुळेच हे तिला यशाचे शिखर गाठता आलं. आणि आता तर तिने पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ठाणे जिल्ह्यात गुणवत्ता यादी झळकून आपली बुद्धिमत्ता



दाखवून दिली आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना कुठल्याही शैक्षणिक सोयी- सुविधा नसताना तसेच कुठलेही कोचिंग क्लास नसताना केवळ आपली अविरत मेहनत , जिद्द व व शिकण्याची आवड या मुळे या शाळेतील शिक्षकांनी तिची गुणवत्ता पाहून बौद्धिक क्षमता निरखून तिला वेळोवेळी मार्गदर्शन केले शिक्षकांनी केलेल्या या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे व तिच्या अथक मेहनतीमुळे तिला या परीक्षेत गगन भरारी घेता आली यासाठी दोनघर आदिवासी पाड्यावरील शाळेतील मुख्याध्यापक प्रदीप चव्हाण सहशिक्षिका कविता भागवत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले तिच्या या धवल यशाने ग्रामीण भागातील विद्यार्थीही शहरी विद्यार्थ्यांबरोबर स्पर्धा करू शकतो व यश संपादन करू शकतो हे तिने मिळविलेल्या यशाने दाखवून दिले आहे.

तिच्या या यशाचं कौतुक सर्वत्र होत असून ठाणे जिल्ह्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, ठाणे जिल्हा परिषदेचे प्राथमिकचे शिक्षण अधिकारी बाळासाहेब राक्षे, आशिष झुंजारराव विस्तार अधिकारी माळी मॅडम संगीता पवार मॅडम यांच्याच प्रेरणेमुळे माझ्या मुलीला हे धवल यश संपादन करता आले हे तिच्या पालकांनी सांगितले.

नडगाव केंद्रातील सर्व शिक्षक वृंद शाळा व्यवस्थापन समिती दोनघर व आदिवासी उन्नती मंडळ, जाणीव प्रतिष्ठान, दीपस्तंभ प्रतिष्ठान,काशिनाथ भोईर प्रतिष्ठान,महेश धिरडे प्रवीण वेखंडे,सुनील पटोले आदी सर्वांनी भूमिकेचे अभिनंदन करून तिच्या मार्गदर्शक शिक्षकांचेही कौतुक केले व सर्वांनी तिला पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

# वसई मनपाची तीन महिन्यांत १२७ कोटींची कर वसूली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** वसई विरार महापालिकेच्या करसंकलन विभागाने मालमत्ता कर वसुलीवर भर दिला आहे. यंदाच्या चालू आर्थिक वर्षात अवघ्या तीन महिन्यात महापालिकेने १२७ कोटींचा मालमत्ता कर वसूल केला आहे. वसई विरार भागात ९ लाखाहून अधिक छोट्या मोठ्या औद्योगिक वसाहती, उपहारगृहे, इमारती, सदनिका अशा विविध मालमत्ता आहेत. या मालमत्ताकरातून पालिकेला उत्पन्न मिळते. २०२४-२५ या आर्थिक वर्षात ३८५ कोटी रुपये इतका मालमत्ता कर वसूल केला होता. यंदाच्या वर्षी ही महापालिकेने पाचशे कोटींचे कर वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार कर वसुली करण्यावर भर दिला आहे. त्यानुसार आर्थिक वर्षाच्या सुरवातीलाच मालमत्ता धारकांनी कर भरणा लवकर करावा यासाठी सवलत ही जाहीर केली होती. यात एप्रिल आणि जून महिन्यात मालमत्ता कर भरणाऱ्यांना करामध्ये ५ टक्के सूट तर संपूर्ण जुलै महिन्यात कर भरणाऱ्यांना ३ टक्के सवलत जाहीर केली आहे. याच योजनांना लाभ घेत कर दात्यांनी कर भरणा करण्यास सुरुवात केली आहे. पहिल्या तीन महिन्यांतच पालिकेने कर संकलनाचा शंभर कोटींचा टप्पा पार करत जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात १२७ कोटींचा कर वसूल केला आहे. मागील वर्षी याच दरम्यान केवळ ८६ कोटी कर वसूल झाला होता असे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

# शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी पालघर जिल्हा परिषदेची शोधमोहीम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघरः** शिक्षण विभागाने पालघर जिल्ह्यात शाळाबाह्य मुलांची संख्या कमी करण्यात प्रगती केली आहे. २०२३ च्या तुलनेत गेल्या वर्षी शाळाबाह्य मुलांमध्ये घट नोंदवली गेली आहे. ज्यामुळे शिक्षण विभागाचे 'शून्य शाळाबाह्य मुले करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे. तर यावर उपाय म्हणून जिल्हा परिषद शाळांमध्ये माध्यमिकचे वर्ग देखील सुरू करण्यात आले आहे.

शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून १ जुलै ते १५ जुलै दरम्यान शोधमोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत सहा ते १८ वयोगटातील मुलांचा शोध घेण्यात येत आहे. २०२३ मध्ये २५० शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करण्यात आले तर २०२४ मध्ये ही संख्या २३६ इतकी होती. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये आठवीपर्यंतच वर्ग असल्याने नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांचे शाळाबाह्य प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले होते. यावर उपाय म्हणून शिक्षण विभागाने या वर्षीपासून ५७ जिल्हा परिषद शाळांमध्ये नववी आणि दहावीचे वर्ग सुरू केले आहेत. यामुळे शाळाबाह्य मुलांचा आकडा शून्यावर आणण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पालघर जिल्ह्यातील एकही विद्यार्थी मूलभूत शिक्षणापासून वंचित राहू नये, तसेच शाळाबाह्य, अनियमित आणि स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाने शोधमोहीम राबवली आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कुटुंबे व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर करतात, तर अनेक कुटुंबे कामासाठी जिल्ह्यात येतात. या स्थलांतरामुळे मुलांच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणात खंड पडतो. अशा मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी ही शोधमोहीम सुरू आहे.

पालघर जिल्ह्याच्या पूर्वपट्ट्यातील विक्रमगड, जव्हार, मोखाडा, तलासरी, वाडा या आदिवासीबहुल भागातून रोजगाराच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. हे स्थलांतर रोखून शाळाबाह्य मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या सर्वेक्षण कालावधीसाठी तालुकास्तरावर 'बालरक्षक' यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# भाईंदरमध्ये इ व्हेईकलच्या दालनाला आग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** भाईंदरमध्ये गुरुवारी रात्री विद्युत वाहनांच्या शोरूमला आग लागल्याची घटना घडली. या आगीत १६ दुचाकी जळून खाक झाल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र दुचाकी जळून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. भाईंदर पूर्व येथील कॅबिन रोड परिसरात एका दुचाकी विद्युत वाहनांच्या शोरूममध्ये गुरुवारी रात्री ही दुर्घटना घडली. शोरूममधील एक वाहन चार्जिंगसाठी लावले असताना सुमारे साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्याच्या बॅटरीला शॉर्टसर्किट झाले. त्यामुळे अचानक आग लागली.

**आगीत 16 दुचाकी जळून खाक झाल्या. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.**

त्या वेळी शोरूममध्ये कोणीही नसल्याने आग काही क्षणांतच पसरली. आगीचे लोट परिसरात उठू लागल्यानंतर स्थानिक नागरिकांनी पालिकेच्या अग्निशमन विभागाला घटनेची माहिती दिली. अग्निशमन दलाच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. मात्र, या आगीत शोरूममधील १६ दुचाकी पूर्णतः जळून खाक झाल्या असून जवळपास दहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांनी दिली.

# भाऊसाहेब नेने महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधुन पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण मधील डी. एल्. एल्. ई. युनीट, एन्. एस्. एस्. युनीट, अलिबाग जिल्हा रुग्णालय व पेण उप जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने ११ जुलै रोजी 'जागतिक लोकसंख्या दिना' निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान केले.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून जवळपास 33 वर्षे या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन दरवर्षी महाविद्यालयातर्फे केले जात आहे. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. तुकाराम माळवे यांनी केले. यावेळी संस्थेचे आधारस्तंभ पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष व 'सोबती' ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने,संस्थेचे माजी कार्याध्यक्ष वसंतराव आठवले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप, एन्. एस्. एस्. युनीटचे डॉ. तुकाराम माळवे,डी. एल.एल.ई.युनिट चे रायगड जिल्हा समन्वयक डॉ.देवीदास क.बामणे' ,डॉ. सुभाष लकडे, विद्यार्थी वर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयातील कार्यालयीन कर्मचारी सौ. कविता देशपांडे, रवि वाडजे यांनी रक्तदान केले. दोन्ही युनीटची विद्यार्थिनी यांसह अनेक विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी पालकांनी रक्तदान केले. तसेच पेण ग्रामीण रुग्णालयातील मंदा पाटील यांनी रक्तदात्यांची एच. आय. व्ही. टेस्ट केली. संस्थापक अध्यक्ष बापुसाहेब नेने यांनी राष्ट्रीय सेवा योजनाआणि डी.एल.एल.ई. युनिट यांच्या कार्याचा गौरव सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र अलिबाग तर्फे डॉ. दिपक गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली वैभव कांबळे,नवनाथ अळ्ळी, गणेश भोये, राजकुमार निकस,अभिषेक घरत, मंगेश पिंगाला, महेश घाडगे आदींनी रक्तसंकलनाचे काम केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रा. तुकाराम माळवे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. डी. के बामणे यांनी केले.

# ठाकरे गट - मनसेच्या वतीने टोल नाका बंद आंदोलन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा ते शहापुर, वांसीद, भिवंडी पर्यंतच्या खराब झालेल्या मुंबई नाशीक महामार्गाचे व लगतच्या सर्वीस रस्त्याची तात्काळ दुरुस्त व्हावी, इतर महत्त्वाच्या समस्या मार्गी लागाव्यात या करीता शिवसेना (ठाकरे)मनसे व इतर सामाजिक संघटनेच्या वतीने टोल नाका बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

पडघा सर्वीस रस्त्याची दुरूस्ती करावी. टोल नाका परिसरातील गावातील रस्त्याची दुरुस्ती करून सर्वीस रस्ते बनवणे, भादाणे अंडरपास मधील तुंबलेल्या पाण्याचा निचरा करणे, शेरेकरपाडा येथे जाण्यासाठी अंडरपास तयार करणे, महामार्गावर मागणी असलेल्या आवश्यक तेथे अंडरपास तयार करणे, सर्वीस रस्त्याची दुरुस्ती करून लगत गटारी बांधणे, पथदिव्यांची व्यवस्था करणे आदी मागण्यांसाठी शिवसेना (ठाकरे) मनसे व इतर सामाजिक संघटनेच्या वतीने गुरूवार दिंनाक १७ जुलै रोजी टोल बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती १० जुलै रोजी शेतकरी सहकारी भातगिरणी सभागृह येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली व नागरीकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी शिवसेना(ठाकरे) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, ॲड. संदीप जाधव, उपतालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, तळवली सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार, विभागप्रमुख भास्कर माळी सापे ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच ज्ञानेश्वर सुतार उपस्थीत होते.

# कल्याण डोंबिवली मनपाच्या फुटबॉल स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, मुंबई, जिल्हा क्रीडा परिषद, ठाणे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ६४ व्या सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सन २०२५-२६ सब ज्युनिअर, ज्युनिअर मुले व मुलींच्या स्पर्धेचे आयोजन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली शहाड पश्चिम येथील सेंच्युरी रेयॉन कंपनीच्या मैदानावर करण्यात आले होते. या स्पर्धेचे उदघाटन महापालिकेचे क्रीडा विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत एकुण ६० संघ सहभागी झाले होते. १५ वर्षाखालील मुलांच्या स्पर्धेत अंतिम सामना लोढा वर्ल्ड स्कूल पलावा व बी के बिर्ला स्कूल यांच्यामध्ये रंगतदार झाला. सदर स्पर्धेमध्ये



लोढा वर्ल्ड स्कूल पलावा या शाळेचा संघ विजयी झाला तर उपविजयी बी के बिर्ला स्कूल कल्याण आणि तिसरा क्रमांक ब्रायटन वर्ल्ड स्कूल यांनी पटकावला.

तसेच 17 वयोगटातील मुलांचा अंतिम सामना बीके बिर्ला स्कूल व स्वामी विवेकानंद स्कूल यांच्यामध्ये रंगतदार झाला. सदर सामन्यामध्ये बी के बिर्ला स्कूलचा संघ अंतिम विजयी ठरला. द्वितीय क्रमांक स्वामी विवेकानंद स्कूल यांनी तर तृतीय क्रमांक ओंकार इंटरनॅशनल स्कूल यांनी पटकावला. 17 वर्षीय मुलींच्या स्पर्धेमध्ये अंतिम सामना लोढा वर्ल्ड स्कूल पलावा व सेंट लॉरेन्स स्कूल यांच्यामध्ये झाला यामध्ये अंतिम विजयी संघ लोढा पलावा स्कूल द्वितीय क्रमांक सेंट लॉरेन्स व तृतीय क्रमांक बी के बिर्ला स्कूल यांनी पटकावला आहे.

स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी दिनांक 10 जुलै 2025 रोजी क्रिडा विभागाचे उपायुक्त संजय जाधव, क्रीडा पर्यवेक्षक प्रवीण कांबळे, खेळ प्रमुख डॉ.विजयसिंह, बी के बिर्ला कॉलेजचे स्पोर्ट्स डायरेक्टर यज्ञेश्वर बागराव, कृष्णा माळी तसेच फुटबॉलपटू सॅमसंग यांच्या उपस्थितीमध्ये बक्षीस वितरण समारोह संपन्न झाला. क्रीडा विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व विशेष प्रयत्नांमुळे प्रथमतः सर्व विजयी संघांचा खेळ संपल्याच्या दिवशी ट्रॉफी व मेडल देऊन गुण गौरव करण्यात आला. सर्व पंच व रेफ्री तसेच मदतनीस यांना स्पर्धेच्या अंतिम दिवशी मैदानावर नियोजित मानधन रोखीने अदा करण्यात आले. स्पर्धेच्या उत्तम नियोजन व आयोजनामुळे सर्व क्रीडा शिक्षक, खेळाडू, पंच पालक यांनी समाधान व्यक्त करून क्रीडा विभागाचे आभार मानले. सदर कार्यक्रमाचे निवेदन बीके बिर्ला कॉलेजचे ठाकरे यांनी केले.




# मुरबाड पंचायत समिती दालनात भरणार शाळा ?

**शिक्षक मिळत नसल्याने मुरबाड पंचायत समितीच्या दालनात शाळा भरवण्याचा टेंभरे बु.सरपंचाचा ईशारा !**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात गेले अनेक वर्ष शिक्षकां अभावी जि.प.शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होऊन शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षकांची अनेक पदे रिक्त असतानाही अनेक शाळांमध्ये 1 ते 7 विच्या वर्गांना 2 ते 3 शिक्षक ओढाताण करून अध्यापनाचे काम करत आहेत.

तालुक्यातील टेंभरे बु.येथे सुद्धा जि.प.शाळेचे 1 ते 7 पर्यंत वर्ग आहेत. मागिल दीड वर्षापासून येथे दोनच शिक्षकांची नेमणूक असून सात वर्गांना अवघे दोन शिक्षक सांभाळत आहेत. यामध्ये एक शिक्षक व शिक्षिका कार्यरत आहेत त्यातही पुरूष मुख्य शिक्षक शारिरीक दृष्टया अधू असल्याने त्यांना अध्यापनात अडचणी येत आहेत. या संदर्भात मुरबाड पंचायत समिती शिक्षण विभागाकडे अजून दोन वाढिव शिक्षक मिळावेत म्हणून मागिल वर्षापासून लेखी मागणी करून सुद्धा शिक्षक दिला जात नसल्याने शिक्षण विभागावर सरपंच सुहास केंबारी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

ज्यादा शिक्षक मिळण्यासाठी टेंभरे गावचे युवा सरपंच सुहास केंबारी हे मागील वर्षांपासून मुरबाड शिक्षण विभागाकडे हेलपाटे मारत आहेत.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी गटविकास अधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना यावर्षीही लेखी निवेदन देऊन दोन शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे परंतु मुरबाड शिक्षण विभाग याकडे गांभीर्याने बघत नाही. जर येत्या आठ दिवसात शिक्षण विभागाने टेंभरे येथे शिक्षक उपलब्ध करून दिले नाही तर शाळेला टाळे ठोकून पंचायत समितीच्या दालनात शाळा भरवली जाईल असा ईशारा सरपंच सुहास केंबारी यांनी प्रशासनाला दिला आहे.

> **सध्या शाळेच्या पटावर तीन शिक्षक दाखवतात परंतु प्रत्येकक्षात मात्र दोन शिक्षक शाळेत हजर असतात. मागिल वर्षी १३० पटसंख्या होती ती कमी होऊन यावर्षी ८० वर आली आहे. असच दुर्लक्ष झाल्यास एक दिवस शाळा बंद पडेल आणी याला सर्वस्वी शिक्षण विभाग जबाबदार असेल.**
> **- सुहास केंबारी, सरपंच ग्रामपंचायत टेंभरे बु.**



# ठाण्यात मोफत महाआरोग्य तपासणी शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, शिवसेना विभाग क्रमांक 03, प्रभाग क्रमांक 15, सिद्धिविनायक हॉस्पिटल, वागळे इस्टेट डॉक्टर असोसिएशन, जय भवानी माता प्रतिष्ठान सामाजिक संस्था व एकनाथ भोईर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक विभागप्रमुख एकनाथ भोईर, माजी नगरसेविका एकता भोईर व युवा सेना ठाणे लोकसभा उपाध्यक्ष यज्ञेश भोईर यांच्या वतीने शिवसेना शाखा जय भवानी नगर वागळे इस्टेट, ठाणे येथे शनिवार दिनांक 12 जुलै 2025 रोजी सकाळी 10.00 ते सायंकाळी 04.00 या वेळेत भव्य मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या महा आरोग्य तपासणी शिबिरामध्ये जनरल तपासणी, नेत्र तपासणी, स्त्रीरोग तपासणी, बालरोग विकार, हाडांचे विकार, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, इसीजी तपासणी, एन्जोप्लास्टी, एनजोग्रफी, मधुमेह तपासणी केली जाणार आहे. तसेच मोफत औषधे व चष्मा वाटप तसेच कॅन्सरसाठी मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी परिसरातील गरजू नागरिकांनी या मोफत महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन विभाग प्रमुख एकनाथ भोईर यांनी केले आहे

## बातमी मागची गोष्ट

# ठाण्यात 'पत्रकारितेची पाठशाळा' उत्साहात संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: ठाणे जिल्ह्यातील प्रसारमाध्यम प्रतिनिधींकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई, कोकण विभागीय माहिती कार्यालय, ठाणे जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा पत्रकार संघ, ठाणे पत्रकार संघ, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघ, नवी मुंबई प्रेस क्लब, ठाणे जिल्हा साप्ताहिक संपादक असोसिएशन, डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने "पत्रकारितेची पाठशाळा - बातमी मागची गोष्ट" या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

ही कार्यशाळा ठाणे महानगरपालिकेच्या कै.नरेंद्र बल्लाळ सभागृहात पार पडली. पत्रकारिता क्षेत्रात ज्ञानवृद्धी व संवाद साधण्याच्या हेतूने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेला ठाणे जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यशाळेच्या प्रारंभी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर आणि दै.ठाणे वैभवचे संस्थापक व जेष्ठ पत्रकार नरेंद्र बल्लाळ यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यशाळेस ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, कोकण विभागीय माहिती उपसंचालक श्रीमती अर्चना शंभरकर, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य कैलास म्हापदी, ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे, नवी मुंबई प्रेस क्लबचे अध्यक्ष मनोज जालनावाला, ठाणे पत्रकार संघाचे अध्यक्ष दिपक सोनावणे, ठाणे शहर दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आनंद कांबळे, ठाणे डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रफुल वाघोले, ठाणे जिल्हा साप्ताहिक संपादक असोसिएशनचे अध्यक्ष राजेश जाधव यांच्यासह विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी, सदस्य आणि जिल्ह्यातील विविध प्रसारमाध्य प्रतिनिधी उपस्थित होते.

कार्यशाळेमध्ये ऑर्गोनॉमिक्स प्रोग्राम मॅनेजमेंट एक्सपर्ट आणि प्रेरणादायी वक्त्या डॉ. मोना पंकज यांनी दैनंदिन कामकाज आणि ताणतणाव व्यवस्थापन याविषयी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक आणि "न्यूज स्टोरी टुडे" पोर्टलचे संपादक देवेंद्र भुजबळ यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींसाठी शासनाच्या विविध योजना, प्रसारमाध्यमे व शासकीय अधिकाऱ्यांची परस्परपूरक भूमिका, कर्तव्य व जबाबदारी याविषयीचे मार्गदर्शन केले. तसेच पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी यांनी पर्यावरण संवर्धन आणि पत्रकारिता याची सांगड कशाप्रकारे घालता येवू शकेल याविषयीचे मार्गदर्शन केले.


प्रास्ताविक भाषणात, कोकण विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष मनोज जालनावाला यांनी अधिस्वीकृती पत्रिकेबाबत थोडक्यात माहिती देत, शासन निर्णयानुसार सर्व पत्रकारांनी अधिस्वीकृती पत्रिकेसाठी जास्तीत जास्त संख्येने अर्ज करावेत. तसेच अर्ज करताना येणाऱ्या अडचणी लेखी स्वरूपात कळवाव्यात, असे आवाहन केले.

उपायुक्त उमेश बिरारी यांनी अशा कार्यशाळा पत्रकारांना नव्या दृष्टीकोनात विचार करण्यास प्रेरणा देतात, असे सांगून सर्व पत्रकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

श्री.कैलास म्हापदी यांनी त्यांच्या पत्रकारितेतील अनुभव कथन करीत बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजना, शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी या योजनांबाबत माहिती दिली. पात्र पत्रकारांनी आवश्यक कागदपत्रांची तयारी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.

श्री.संजय पितळे यांनी शासनाकडून पत्रकारांना देण्यात येणाऱ्या लाभांच्या अटी सुलभ करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.), ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव (भा.प्र.से.), माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह (भा.पो.से.), संचालक (माहिती) (प्रशासन) हेमराज बागूल, संचालक (माहिती) (माध्यम आराखडा) किशोर गांगुर्डे, संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) डॉ.गणेश मुळे, कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या उपसंचालक (माहिती) अर्चना शंभरकर, ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (1) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी आणि जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर तसेच जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांचे विशेष मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. या कार्यशाळेला ठाणे जिल्ह्यातील विविध भागातील पत्रकार, संपादक, प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चर्चासत्र, प्रश्नोत्तरे आणि अनुभव कथनाच्या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. ही कार्यशाळा पत्रकारांसाठी केवळ माहितीपर नव्हे तर व्यावसायिक दृष्टिकोनातून व शासन-प्रशासन आणि प्रसारमाध्यमे यांच्यातील सकारात्मक संबंध वृद्धिंगत होण्यास उपयुक्त ठरली. पत्रकारितेतील नव्या वाटा शोधण्यासाठी ही "पाठशाळा" महत्त्वपूर्ण ठरली, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केला.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



आयुष्यात अत्यंत यशस्वी व मोठ्या असणाऱ्या प्रत्येक व्यक्ती त्यांच्या गुरुच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून, पुढे जात मोठ्या होतात. अगदी एकलव्याचेच उदाहरण घ्या. गुरुने त्याला नाकारले तरी त्याने सरावाच्या वेळी आपल्या गुरुंचा पुतळा उभा करून धनुर्विद्येचा अभ्यास केला. या मागचा भावार्थ असा, आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अथक परिश्रम तर हवेच पण त्याला श्रद्धेची, विश्वासाची जोडही हवी. हा विश्वास, श्रद्धा आपल्याला गुरुत दिसते. त्याच्याकडून आपल्याला प्रेरणा मिळते. ही प्रेरणा देणारी व्यक्ती आपला गुरुच आहे.

गुरूमाऊली - प.पू.स. अलोकनाथजी महाराज

# साथरोग प्रतिबंधासाठी मनसेचे वासिंद ग्रामपंचायतीला निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण: पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे विविध आजाराची साथ पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यासाठी वासिंद ग्रामपंचायतीने योग्य ती खबरदारी घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी यासाठी वासिंद शहर मनसेच्या वतीने वासिंद ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांना लेखी निवेदन दिले आहे.

कल्याण डोंबिवली महा नगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे डेंगूमुळे एका रुग्णाचे दुर्देवी निधन झाले असल्याची बातमी प्रसिद्ध झाल्याने खळबळ उडाली आहे. सदर अशा घटना वासिंद मध्ये घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून वासिंद शहरात ठीक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साठल्यामुळे त्यास दुर्गंधी येत आहे सध्या डम्पिंग ग्राउंड च्या समस्येमुळे रोज साठणारा कचरा ही वासिंद करांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे या दुर्गंधीयुक्त साठलेल्या कचऱ्यामुळे डेंगू सारख्या साथीजन्य आजारांना आमंत्रण मिळण्याची शक्यता आहे यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने पावसाळ्यात औषध फवारणी करून कचरा व्यवस्थापनाची योग्य ती सोय करावी तसेच वासिंदच्या नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठ्यासाठी तातडीने उपयोजना करावी व त्याच्या आरोग्याची काळजी घ्यावी यासाठी वेळोवेळी जंतुनाशक औषधांची फवारणी करावी तसेच इतर आवश्यक असणारी आरोग्य संबंधी कामे करण्याबाबत तात्काळ कारवाई करावी जेणेकरून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहील हे पहावे यासाठी वासिंद शहर मनसेचे अध्यक्ष अमोल बोराडे, तालुका उपाध्यक्ष हर्षल अस्वले शहर सचिव कल्पेश शेलार शहर उपाध्यक्ष हरीश गवळी मनविसे शहर उपाध्यक्ष वैभव काठोळे, उमेश साळुंखे, मिलिंद तारमळे अल्पेश खिसमतराव, आनंद पाचघरे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे.

# गुरुपौर्णिमेनिमित्त खवली माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय खवली, तालुका: सुधागड, रायगड. या विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यालयाचे मुख्याध्यापक मोरे एम. व्ही. सर यांनी व्यास ऋषींच्या प्रतिमेचे पूजन करून श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचा श्रीगणेशा केला.

यावेळी विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतात गुरुचा महिमा, गुरुबद्दल असलेले प्रेम, गुरु शिष्याचे नाते ,याविषयी छान असे भाषण केले. मुख्याध्यापक मोरे सरांनी विद्यार्थ्यांना गुरुचा महिमा याबद्दल माहिती सांगितली, "प्रत्येकाला जीवनात यशस्वी होण्यासाठी एका मार्गदर्शकाची गुरुची गरज असते असे विद्यार्थ्यांना सांगितले!" देवरे सर यांनी आजच्या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे फलक लेखन केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मोहिते मॅडम यांनी केले व विलास डुबे यांनीही गुरु विषयी माहिती सांगितली. यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समीर पाटील यांनी केले. या कार्यक्रमासाठी कार्यालयीन प्रमुखा सौ.दीक्षा पवार ,सौ दंत मॅडम, श्री. फसाळे सर ,श्री. डोके सर , शेखर जोशी व श्री. गडगे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उत्तम सहकार्य केले.

# भाजप राज्य परिषद सदस्य पदी सुरेखा इरणक, भास्कर भांगरे यांची निवड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शहापूर विधानसभा मतदार संघातील सुरेखा इरणक व भास्कर भांगरे यांची भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश राज्य परिषद सदस्य पदी निवड झाली आहे.

सुरेखा अशोक इरणक या भाजपचे ज्येष्ठ नेते शहापूर विधानसभा निवडणूक प्रमुख तथा प्रदेश उपाध्यक्ष अशोक इरणक यांच्या पत्नी असून त्या गेल्या तीस वर्षांपासून पक्षात कार्यरत आहेत. जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून येऊन लोकप्रतिनिधी बरोबर त्यांनी महिला मोर्चा ठाणे ग्रामीण जिल्हा सरचिटणीस, जिल्हा उपाध्यक्ष ही पक्ष संघटना पद भूषविली आहेत तसेच ठाणे जिल्हा परिषद आरोग्य समिती सदस्य व जिल्हा नियोजन समिती सदस्य पदी त्यांनी काम केले आहे. त्याचबरोबर माजी नगरसेवक भास्कर रखमा भांगरे हेही पक्ष संघटनेत कार्यरत आहेत.

भाजप ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष जितेंद्रजी डाकी व कृषि उत्पन्न बाजार समिती माजी उपसभापती तुकाराम भाकरे यांनी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाकडे केलेल्या शिफारशी नुसार सुरेखा इरणक व भास्कर भांगरे या दोन्ही आदिवासी समाजातील कार्यकर्त्यांना मान मिळून भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश राज्य परिषद सदस्य पदी काम करण्याची संधी मिळाली असल्याचे भाजपचे शहापूर विधानसभा निवडणूक प्रमुख अशोक इरणक यांनी म्हटले आहे.

# उशीद येथे नियंत्रित पद्धतीने भात शेती लागवडीचे मार्गदर्शन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण : वासिंद जवळील उशीद येथे तालुका कृषी अधिकारी कल्याण यांच्या मार्गदर्शनाने अंतर्गत नियंत्रित पद्धतीने भात पिकाची लागवड करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी उशीद येथील शेतकरी रुपेश कुंडलिक पितांबरे यांच्या शेतात स्वतः तालुका कृषी अधिकारी सूर्यकांत कांबळे, उपकृषी अधिकारी विजय पाटील यांनी पट्टा पद्धतीने भात पिकाची लागवड करण्यासाठी शेतात उतरून मार्गदर्शन व प्रात्यक्षिक करून दाखविले.

पट्टा पद्धतीने लागवड करण्याचे अनेक फायदे होत असल्याचे सहायक कृषि अधिकारी प्रसाद भोकरे यांनी शेतकऱ्यांना सांगितले,नियंत्रित पद्धतींमध्ये योग्य अंतरावर रोपांची लागवड केल्याने त्यांना पुरेसा सूर्यप्रकाश मिळतो आणि हवा खेळती राहते. यामुळे प्रकाशसंश्लेषणाची प्रक्रिया अधिक कार्यक्षमतेने होते, ज्यामुळे अन्ननिर्मिती वाढते आणि उत्पादनात लक्षणीय वाढ होते. रोपांना फुटवे जास्त येतात त्यामुळे बियाणे खर्च बचत होते. रोपांमध्ये खोडकिडा आणि पानांवरील करपा यांसारख्या कीड आणि रोगांना प्रतिकार करण्याची क्षमता वाढते. यामुळे कीटकनाशकांचा वापर कमी होतो आणि पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होतो. तण नियंत्रणात मदत होते, त्यामुळे तणनाशकांवरील खर्च कमी होतो.यावेळी जीवामृत आणि गिरिपुष्प चा वापर करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला त्याचे प्रात्यक्षिक तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक वैशाली भापसे यांनी करून दाखवले. यावेळी शेतकरी रुपेश पितांबरे, भगवान तारमळे, आदी शेतकरी उपस्थित होते, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी यांच्याकडून नियंत्रित पद्धतीने लागवड करण्याचे आव्हान करण्यात आले.

## डोंबिवली : शिंदे सेना व काँग्रेस पक्षातील

# कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : दिनांक 10 जुलै २०२५ डोंबिवलीसाठी राजकीयदृष्ट्या ऐतिहासिक ठरला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख मा. उद्धवजी बाळासाहेब ठाकरे साहेब आणि युवानेते मा.आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या लोकाभिमुख कार्यशैलीने प्रेरित होऊन, डोंबिवली शहर प्रमुख प्रकाशजी तेलगोटे यांच्या माध्यमातून, शिंदे गट व काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते पक्षत्याग करून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या जाहीर प्रवेशात प्रवीण गणपत साळवी (शिंदे गट ,वाहतून सेना कल्याण डोंबिवली अध्यक्ष), कैलास दिनकर सणस(ग्राहक संरक्षण कक्ष उप शहर संघटक व उप- विभाग प्रमुख शिंदे गट), आणि शिबू शेख(महाराष्ट्र प्रदेश सचिव, अल्पसंख्यख विभाग काँग्रेस ) यांच्यासह सुमारे १५०-२०० पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकमुखी निर्णय घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या बाळासाहेबांच्या खऱ्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या पक्षात प्रवेश केला. या महत्वपूर्ण प्रवेश सोहळ्याला कल्याण जिल्हा प्रमुख मा.दिपेश पुंडलिक म्हात्रे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत करताना त्यांनी सांगितले की, "आजचा हा शक्तीप्रवेश म्हणजे डोंबिवलीतील जनतेचा विश्वास ठाकरे कुटुंबियांच्या नेतृत्वावर असून, ही लाट भविष्यात अजून प्रबळ होणार आहे."

या पक्ष प्रवेश सोहळयामुळे डोंबिवलीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची ताकद अधिक बळकट झाली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग पक्षवाढीला अधिक गती देईल, असा विश्वास दिपेश म्हात्रे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.या प्रवेश सोहळयात कल्याण जिल्हा संघटक तात्यासाहेब माने , डोंबिवली शहर सचिव सुरेश परदेशी संजय पाटील, श्याम चौगुले चेतन म्हात्रे महिला आघाडी कल्याण ग्रामीण व डोंबिवली विधानसभा संघटक सुप्रियाताई चव्हाण, प्रियांका विचारे युवासेनेचे आदित्य पाटील, युवती सेनेचे रिचा कामतेकर तसेच शिवसेना पक्षाचे पदाधिकारी शिवसैनिक महिला आघाडी युवासैनिक उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | |
|---|---|
| १ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024